# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १५.११.२०२५

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि.१४/११/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३५,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. १४/११/२०२५ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ४७००/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. १४/११/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणा—या वाहन चालकाविरूध्द कलम २८५ भान्यासं प्रमाणे एकुण ०२ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द अंतर्गत दि.१४/११/२०२५ रोजी पोस्टे गोरेगाव येथे ०१ व पोस्टे वसमत शहर येथे ०१ कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०२ ठिकाणी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.